क्र. जमीन-२६९५/९९९/प्र. क्र. ६०७४/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक:- ९ डिसेंबर, १९९८.

विषय:- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा

मौ. आणिक ता. कुर्ला स. नं. ९४ हिस्सा नं. १
न. भू. क्र. ३१० येथील जमीन विद्युत उपकेंद्रासाठी
बी. एस. ई. एस. कंपनीस देण्याबाबत...

शासन ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचेकडील क्र. कार्या-३डी/कावि-४०३/९७, दिनांक २. ६. ९७ व क्र. सी/कार्या-३डी/कावि-४१९/९८, दिनांक २८. ८. ९८ च्या पत्रांना अनुलक्षून विनंतीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, मौ. चेंबूर, वाशी नाका, आर. सी. मार्ग येथील व ओसवाल कंपनीच्या मागील न्यु भारतनगर या वसाहतीस विद्युत पुरवठा करण्याकरिता मौ. आणिक ता. कुर्ला स. नं. ९४ हिस्सा नं. १, न. भू. क्र. ३१० येथील ३७. २० चौ. मी. [२० x २० =४०० चौ. फूट] जमीन मुंबई उपनगर विज पुरवठा [बी. एस. ई. एस. ] कंपनीला विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी रु. ६०००/- प्रति चौ. मी. या तात्पुरत्या मुल्यांकनाने होणा-या जमिनीच्या किंमतीवर प्रचलित दराने भुईभाडे आकारून १० वर्षाच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी/शर्ती तसेच पुढील अटी/शर्तीवर मंजूर करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

[१] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा [बी. एस. ई. एस. ] कंपनीने नगररचना व मुल्य-निर्धारण विभागाद्वारे निर्धारित करण्यात येणा-या बाजारमुल्यानुसार शासन अंतिमत: ठरविल त्या दराने प्रस्तुत प्रकरणी जमिनीची भाडेपट्टा रक्कम भरण्यास तयार असल्याचे लेखी मुद्रांकित हमीपत्र द्यावे.

[२] सध्याचा तात्पुरता दर रु. ६०००/- प्रति चौ. मी. गृहीत धरुन भाडेपट्टा निश्चित करण्यात यावा व तात्पुरते मुल्यांकन व नगररचना व मुल्यनिर्धारण विभागाद्वारे ठरविण्यात येणारे अंतिम मुल्यांकन यामधील फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हाधिका-यांनी कळविल्यापासून एक महिन्याच्या आत विहित दराने व्याजासह भरणा करावी.

[३] जमिनीचा वापर वीज उपकेंद्रासाठीच करण्यात यावा.

[४] कंपनी यावर व्यतिरिक्त केलेले इतर सर्व बांधकाम अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे व मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्याशी सुसंगत असे करील.

[५] जिल्हाधिका-यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

२. हे शासन ज्ञापन वित्त विभागाच्या ठराव क्र. वि. अ. प्र–१०९२/प्र. क्र. १४८/९२/ विनियम, दिनांक १. ८. ९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म. मु. गरदे ]
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा
एम. एम. आर. डी. एइमारत
वांद्रे [पूर्व], मुंबई:– ४०० ०५१.

प्रतिलीपी:–

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३] उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
४] सहाय्यक संचालक, नगररचना, मुंबई.
५] महालेखापाल–१ [लेखा परिक्षा], मुंबई.
६] महालेखापाल–१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई.
७] उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८] वित्त विभाग [व्यय–९], मंत्रालय, मुंबई.
९] नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०] बी. एस. ई. एस. लि. सप्लाय डिव्हीजन, पो. बॉ. नं. ६८०६, इलेक्ट्रिसीटी हाउस, सांताक्रुझ [पूर्व], मुंबई:– ५५.
११] ज–३ कार्यासन, महसूल व वन विभाग [निवडनस्ती.]

क्र. जमिन/कार्यासन-१११/९५

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
एम. एम. आर. डी. ए. इमारत, ४था मजला,
वांद्रा [पूर्व], मुंबई – ४०० ०५१.
दिनांक :- ४/९/९८

प्रति,

वरीष्ठ व्यवस्थापक,
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कं.
पोस्ट बॉक्स नं. ६८०८,
इलेक्ट्रिक हाऊस, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई–४०० ०५५.

विषय :- जमीन – मुंबई उपनगर जिल्हा.

मौजे आणिक, तालुका कुर्ला, स. नं. २४, हि. नं. १, नमुक्र. ३२० पैकी न्यू भारत नगर ओसवाल कंपनीच्या मागील वसाहतीत वीज पुरवठा करण्याकरीता विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी केलेली जमीनीची मागणी.

संदर्भ :- आपले पत्र दिनांक ४.१.१९९५

महोदय,

आपल्या उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भात नमूद केलेल्या दिनांक ४.१.१९९५ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मौजे आणिक स. नं. २४, हि. नं. १, नमुक्र. ३२० पैकी वडाळा कुर्ला रीक्लमेशन स्किम यांचे नावे असलेल्या जमीनीपैकी २० x २० = ४०० चौ. फूट [ ३७.२० चौ. मी. ] जमीन न्यू भारत नगर ओसवाल कंपनीच्या मागील वसाहतीतील रहिवाश्यांना वीज पुरवठा करण्यासाठी विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राथमिक सुविधांपैकी अत्यावश्यक बाब म्हणून खालील अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.

१] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस शासन ठरविल ती भाडेपट्ट्याची रक्कम विहित दराने व्याजासह शासनास भरावी लागेल.

२] ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या जमीनीचा उपयोग विद्युत उपकेंद्रासाठीच करावा लागेल.

३] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी जागा व्यतिरिक्त उर्वरित सर्व बांधकाम अर्धवट ना तुरत्या स्वरुपात करील.

४] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी शासनाचे प्रचलित धोरणानुसार जागा संरक्षणास

[कृ. मा. पहा]

पात्र असलेल्या झोपडीधारकांना विद्युत जोडणी देईल.

५] सदर जमीन मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस शासन ज्या अटी व शर्तींवर मंजूर करील त्या सर्व अटी व शर्ती कंपनीला मान्य असतील व त्या कंपनीवर बंधनकारक राहतील.

६] विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी परवानगी देण्यांत येत असलेल्या प्रश्नांकित जमीनीवर कंपनीला कोणताही हक्क सांगता येणार नाही.

७] विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी परवानगी देण्यांत येत असलेली परवानगी ही शासनाच्या जमीन मंजूरीच्या अंतिम आदेशास आधीन राहून देण्यांत येत आहे.

८] प्रश्नांकित जमीन कंपनीला मंजूर न करण्याचा अंतिम निर्णय शासनाने घेतल्यास तो कळविल्यापासून सांत दिवसांचे आंत सदर विद्युत उपकेंद्र कंपनीला काढून टाकावे लागेल. आणि त्याबाबत त्यांना कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

९] उपरोक्त अटी व शर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास जमीन सरकार जमा करण्यांत येईल.

१०] वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे रु २०/- च्या मुद्रांकित पेपरवरील हमीपत्र कंपनीस या कार्यालयास सादर करावे लागेल.

वरील प्रमाणे हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर उक्त विषयांकित मागणी केलेल्या जमीनीचे सिमांकन करुन ताबा देण्याच्या सूचना नगर भूमापन अधिकारी चेंबूर यांना देण्यांत येईल.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

प्रतिलिपी :-

नगर भूमापन अधिकारी चेंबूर यांजकडे माहितीसाठी व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, कंपनीने वर नमूद केल्याप्रमाणे हमीपत्र जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना सादर केल्याची खात्री करुन जमीनीचे सिमांकन करुन कंपनीस ताबा देण्याची कार्यवाही करावी व जमीनीचे

नकाशाच्या व ताबा पावतीच्या प्रत्येकी तीन प्रतीसह पुर्तता अहवाल सादर करावा.

प्रत:- तहसिलदार कुर्ला यांजकडे माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- सहाय्यक संचालक नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग यांस सोबत जमीन मागणी नकाशाची प्रत जोडली आहे. तरी प्रस्तुत जमीनीचे सध्याचे बाजारमूल्य या कार्यालयास तातडीने कळवावे.

प्रत:- मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांस या कार्यालयाचे पत्र क्र.सी/कार्यालि-३डी/कार्यव-४९१/९८, दिनांक २८.८.१९९८ अन्वये कार्योत्तर मंजूरी साठी सविनय सादर.

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे.

419

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

मे४९९८

4/9/98
Issued
Five (5)